सत्यमेव जयते

# महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई

शासकीय कुटीर क्र.३ व ४, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई -४०००२१.
✆ : (०२२) २२०२९७५२, फॅक्स-२२०२३१८५, ई-मेल : registrar_mat_mumbai@yahoo.co.in

क्र.मप्रन्या/आस्था/ मुंबई/ १६६ /२०१६ दिनांक : 15 JAN 2016

वाचा :- १. महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, १९८२, दि.२१.०६.१९८२
२. महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, १९८२, दि.२३.०९.१९८८
३. साप्रवि परिपत्रक क्र. एसआरव्ही-२००५/प्र.क्र.५६/२००५/१२, दि.३०.०९.२००५
४. साप्रवि परिपत्रक क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, दि.२१.१०.२०११
५. कार्यालयीन टिप्पणी दि.१४.०१.२०१६

## कार्यालयीन आदेश

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाची **सन २०११ पासून सन २०१५ पर्यंतची सेवाज्येष्ठता यादी अंतिम** करण्यात आली आहे.

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, दि. २१.१०.२०११ नुसार महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या **प्रबंधक, उप प्रबंधक, स्वीय सहाय्यक, लघुलेखक (उ.श्रे.), लघुटंकलेखक, लिपिक, वाहनचालक व सफाईगार** या संवर्गामध्ये काहीही बदल नसल्यामुळे मात्र **सहाय्यक प्रबंधक/संशोधन अधिकारी/वरिष्ठ स्वीय सहाय्यक, अधीक्षक/शिरस्तेदार, सहाय्यक/लेखापाल, चोपदार, नाईक व शिपाई** या संवर्गाची दि.०१.०१.२०१६ ची तात्पुरती सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

मा. अध्यक्ष, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी दिलेल्या आदेशानुसार सेवाज्येष्ठतासूचीत काही वास्तविक चुका अथवा त्रुटी राहील्या असतील तर त्याबाबत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेकडून त्याबाबत **हरकती प्राप्त करुन घेण्याकरीता सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांचा कालावधी** देण्यात येत आहे.

यासोबत प्रसिध्द करण्यात येणाऱ्या दि.०१.०१.२०१६ ची तात्पुरती सेवाज्येष्ठता यादी अंतिम करावयाची असल्याने सदर कालावधी नंतर आलेल्या हरकती/आक्षेप यांचा विचार करण्यात येणार नाही याची दखल घेण्यात यावी.

सदर तात्पुरती सेवाज्येष्ठता यादी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या वेसाईटवर (www.mat.maharashtra.gov.in) Information → Seniority या सदराखाली उपलब्ध करण्यात आली असून मुंबईसह नागपूर व औरंगाबाद खंडपीठाच्या नोटीस बोर्डावरही तात्काळ प्रसिध्द करण्यात यावी.

15/1/16

प्रबंधक,
(मुख्य खंडपीठ)
महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,
मुंबई

प्रति :-

१. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद.
२. संबंधीत अधिकारी/कर्मचारी.
३. नोटीस बोर्ड.